# पवारांचा आवडता मासा अन् विलासरावांचे भाकरीप्रेम!

## सुधीर गाडगीळ यांनी उलगडलं 'मानाचं पान', प्रा. आपटे यांच्या हस्ते प्रकाशन

प्रतिनिधी
पुणे

चवीने खाणारे राजकारणी कमी असले, तरी शरद पवारांना मासा आवडायचा.... तर गिरिजीच्या भाकरीवर विलासराव देशमुख यांचे किती प्रेम..प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांनी राजकारण्यांबरोबरच अनेकांच्या आवडीनिवडी उलगडून दाखवत 'मानाचे पान' रंगवले.

'चपराक प्रकाशन'च्या वतीने सुधीर गाडगीळ लिखित 'मानाचं पान' या पुस्तकाचे प्रकाशन मत अर्थतज्ज्ञ आणि खाद्यपदार्थांचे जाणकार प्रा. प्रदीप आपटे यांच्या हस्ते झाले. बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे, पुण्यातील रुपाली आणि वैशाली या सुप्रसिद्ध हॉटेलचे चालक जगन्नाथशेठ शेट्टी, बुकगंगा या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संकेतस्थळाचे संचालक मंदार जोगळेकर, 'चपराक'चे प्रकाशक घनश्याम पाटील उपस्थित होते.

या वेळी गाडगीळ यांनी अनेक किस्से सांगितले. ते म्हणाले, वलयांकित लोक खातात काय? याविषयी पत्रकार म्हणून जिज्ञासा होती. गायन, सिनेमा, नाटक,



**पुणे : 'चपराक प्रकाशन'च्या वतीने सुधीर गाडगीळ लिखित 'मानाचं पान' या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. प्रदीप आपटे यांच्या हस्ते झाले. घनश्याम पाटील, जगन्नाथशेठ शेट्टी, मंदार जोगळेकर आदी.**

चित्रकला, नृत्य, शिल्प, जाहिरात आणि राजकारण या विविध क्षेत्रातल्या व्यक्तींसोबत खाता–खाता, बोलता–बोलता त्यांच्या आवडी–निवडी जाणून घेता आल्या. माणूस काय खातो? कुठे खातो? कसा खातो? यातूनच त्याचं खाणं आणि वागणं यांचं नात जोडता येतं. चवीने खाणारे राजकारणी कमी असले, तरी शरद पवारांना आवडणारा आणि तरतरी आणणारा मासा आमच्याकडे उपलब्ध आहे, अशीही पाटी एका हॉटेलमध्ये होती. विलासराव देशमुख टिळक रोडवरच्या गिरिजाच्या परातीतील भाकरीवर किती प्रेम करायचे. अशा अनेक दिग्गजांच्या खाण्यावर या पुस्तकात लिहिल्याचे त्यांनी सांगितले.

हॉटेल उद्योजक जगन्नाथशेठ शेट्टी यांच्याशी हसत–खेळत गप्पा मारल्या. चार रुपये महिना पगारापासून ते रुपाली–वैशालीच्या यशापर्यंतची वाटचाल त्यांनी उलगडून दाखवली. मराठीत पु. ल. देशपांडे आणि जयवंत दळवी यांचा अपवाद वगळता खाण्यावर अत्यंत कमी लिखाण झाले असल्याचे प्रा. आपटे म्हणाले.